सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य
जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

आयोजित

## जिल्हास्तर शालेय व इतर क्रीडा स्पर्धा

# माहिती पुस्तिका

## २०१९-२०२०



"बलवान व निरोगी माणसांकडून बल व आरोग्य उधार घेता येत नाही,
हे स्वतःच प्राप्त करावे लागते"

जा.क्र. भिनिश मनपा /जिक्रीस्प/ २०१९-२०/४८
दिनांक : २९/०७/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या,
मा. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
भिंवडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्र, भिंवडी

**विषय : सन २०१९-२०२० विविध क्रीडा स्पर्धा आयोजनाबाबत.....**

महोदय/महोदया,

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील विविध शालेय व इतर खेळांच्या क्रीडा स्पर्धेच्या कार्यक्रमांची माहिती सोबत पाठवित आहे.

आपणास विदितचआहे की, सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून शालेय व इतर क्रीडा स्पर्धेचे कामकाज ऑनलाईन प्रणालीव्दारे करण्यात आलेले असून क्रीडा स्पर्धेची माहिती वेळोवेळी आपल्या स्कुल डॅशबोर्डवर उपलब्ध होईल.

क्रीडा स्पर्धेच्या माहितीचे आपण व्यक्तिश: अवलोकन करून शासनाच्या सुधारीत क्रीडा धोरणाच्या अनुषंगाने सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात विविध खेळांच्या क्रीडा स्पर्धेत आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग होणाच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करावे.

त्याचबरोबर स्पर्धापूर्वी आणि स्पर्धा कालावधीत आपल्या शाळेतील शारीरिक शिक्षण शिक्षक / शिक्षिका यांना स्पर्धेच्या कामानिमित्त कार्यमुक्त करून त्यांची सेवा व आपल्या अधिपत्याखालील क्रीडांगण, क्रीडा विषयक सुविधा मागणीनुसार उपलब्ध करून देऊन विविध स्पर्धा व क्रीडा विषयक कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यास सहकार्य करावे, अशी आपणांस विनंती आहे.

सहकार्याच्या अपेक्षेसह धन्यवाद!

आपला विश्वासू,

**(रमेश पोशमपेललू)**
क्रीडा अधिकारी तथा सदस्य,
क्रीडा स्पर्धा आयोजन समिती, भिंवडी निजामपूर शहर, मनपा

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर :**

१) मा.आयुक्त / संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद, ठाणे.
३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा उपाध्यक्ष,जिल्हा क्रीडा परिषद, ठाणे.

४) मा. आयुक्त, नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर / कल्याण डोबिंवली / उल्हासनगर महानगरपालिका ठाणे जिल्हा
५) मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, जिल्हा पालघर
६) मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल, जिल्हा रायगड
७) मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई
८) मा. नियंत्रण अधिकारी, क्रीडा विभाग, भिंवडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिंवडी
९) मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ -१ व २ भिंवडी शहर
१०) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद सदस्य / सदस्या, ठाणे जिल्हा
११) मा. जिल्हा क्रीडा अधिकारी ठाणे / मुबई शहर / मुंबई उपनगर / रायगड / पालघर जिल्हा
१२) मा. अध्यक्ष / सचिव, सर्व एकविध खेळांच्या जिल्हा क्रीडा संघटना, ठाणे जिल्हा
१३) मा.माध्यमिक शिक्षण विभाग प्रमुख व मा. प्रशासनाधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक) तथा सदस्य, क्रीडा स्पर्धा आयोजन समिती, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिंवडी यांना विनंती करण्यात येते की, सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात आयोजित करण्यात येणा-या शालेय व इतर क्रीडा स्पर्धेत आपल्या अधिपत्याखालील शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग होण्याच्या तसेच स्पर्धा यशस्वी पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून सहकार्य करण्याविषयी प्राचार्य, प्राचार्या, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका यांना सुचित करुन आपल्या अधिपत्याखालील अधिकारी/ कर्मचा-यांच्या मार्फत पाठपुरावा करुन भिंवडी शहरातील विद्यार्थ्यांना शारीरिक सुदृढ बनविण्यासाठी सहकार्य करावे, अशी आपणांस विनंती आहे.
१४) मा. समुह साधन केंद्र प्रमुख १ ते १२, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी यांना विनंती करण्यात येते की, सन २०१९ - २० या शैक्षणिक वर्षात आयोजित करण्यात येणा-या शालेय व इतर क्रीडा स्पर्धेत आपल्या अधिपत्याखालील समूह साधन केंद्रातंर्गत येणा-या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग होण्याच्या तसेच स्पर्धा यशस्वी पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या क्रीडा स्पर्धा आयोजन समितीस सहकार्य करण्याविषयी सर्व प्राचार्य, प्राचार्या, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका तसेच क्रीडा शिक्षक/ शिक्षिका यांना अवगत करावे, अशी आपणास विनंती आहे

आपला विश्वासू,

**(रमेश पोशमपेललू)**
क्रीडा अधिकारी तथा सदस्य,
क्रीडा स्पर्धा आयोजन समिती, भिंवडी निजामपूर शहर, मनपा

## महानगरपालिका हद्दीतील शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शालेय व इतर क्रीडा स्पर्धांना जिल्ह्याचा दर्जा.

भारतीय शालेय खेळ महासंघाच्या विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध खेळांच्या विविध वयोगटातील शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या पदक तालिकेत महाराष्ट्र राज्य भारतात आजपावेतो अग्रगण्य स्थानी आहे.

विविध खेळांच्या, विविध वयोगटातील खेळाडूंची संख्या वाढविण्याच्या तसेच शालेय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडुंना सहभागाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक राक्रीधो-१०९६/प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१ दि.१४ नोव्हेंबर, २००३ अन्वये जिल्ह्यातील महसुली तालुक्याव्यतिरिक्त सध्या अस्तित्वात असलेल्या आणि यापुढे अस्तित्वात येणा-या महानगरपालिकांच्या शहरांना आंतरशालेय क्रीडा स्पर्धेसाठी जिल्ह्याचा दर्जा देण्यात आलेला आहे.

महानगरपालिका व महानगरपालिकांच्या हद्दीत येणा-या खाजगी (अनुदानित व विना अनुदानित) प्राथमिक / उच्च प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळा तसेच वरिष्ठ महाविद्यालयास सलग्न कनिष्ठ महाविद्यालयाच्या शालेय व इतर क्रीडा स्पर्धांचे आयोजन संबंधित महानगरपालिका जिल्हा क्रीडा परिषदेच्या अंतर्गत मा.महानगरपालिका आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली क्रीडा समिती स्थापन करून करतील. तसेच दिनांक १४ नोव्होंबर २००३ च्या शासन शुध्दीपत्रकात नमुद केल्या प्रमाणे स्पर्धा आयोजन करिता येणारा स्पर्धा आयोजन खर्च संबंधित महानगरपालिकांनीच करावयाचा आहे.

महानगरपालिका हद्दीत आयोजित करण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धेत विजयी झालेला संघ/खेळाडूं हा महानगरपालिकेचा जिल्हा संघ/खेळाडूं म्हणून विभागीयस्तरावर व विभागास्तरावरील विजयी संघ/खेळाडूं राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होईल.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जिल्हा संघ /खेळाडूं विभागीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणारा महानगरपालिका शाळेचा असल्यास स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूं, व्यवस्थापक यांचा प्रवास व भोजन या बाबींवर होणारा खर्च संबंधित महानगरपालिकेद्वारे करण्यात यावा. महानगरपालिका हद्दीतील खाजगी (अनुदानित/विना अनुदानित) शाळेचा संघ/ खेळाडूं असल्यास संबंधित शाळेने प्रचलित नियमानुसार स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूं व व्यवस्थापक यांचा प्रवास व भोजन खर्च करावा.तसेच राज्य स्तरीय स्पर्धेसाठी प्रवास खर्च करावा.

ठाणे जिल्ह्यात ठाणे महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका, कल्याण-डोबींवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका असे सहा महानगरपालिका अस्तित्वात असुन उक्त महानगपालिकांच्या हद्दीत येणाऱ्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालयास सलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विविध खेळांच्या विविध वयोगटात शालेय, इतर क्रीडा स्पर्धा थेट जिल्हास्तरापासुन आयोजित करण्यात येतात.

# खेळाडूंच्या वयोगटाचा तक्ता

| अ.क्र. | क्रीडा स्पर्धा | वयोगट | इयत्ता | खेळाडूंचा जन्म |
|---|---|---|---|---|
| १ | शालेय क्रीडा स्पर्धा | १९ वर्षाआतील | किमान इयत्ता ६ वी अथवा पुढील कोणत्याही इयत्तेत शिकत असलेले | ०१-०१-२००१ अथवा त्यानंतरचा |
| २ | शालेय क्रीडा स्पर्धा | १७ वर्षाआतील | किमान इयत्ता ६ वी अथवा पुढील कोणत्याही इयत्तेत शिकत असलेले | ०१-०१-२००३ अथवा त्यानंतरचा |
| ३ | शालेय क्रीडा स्पर्धा | १४ वर्षाआतील | किमान इयत्ता ६ वी अथवा पुढील कोणत्याही इयत्तेत शिकत असलेले | ०१-०१-२००६ अथवा त्यानंतरचा |
| ४ | शालेय क्रीडा स्पर्धा | ११ वर्षाआतील | इयत्ता ३ री ते ५ वी पर्यंत शिकत असलेले | ०१-०१-२००९ अथवा त्यानंतरचा |
| ५ | सुब्रतो मुखर्जी कप फूटबॉल | १७ वर्षाआतील | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | ०१-०१- २००३ अथवा त्यानंतरचा |
| ६ | सुब्रतो मुखर्जी कप फूटबॉल | १४ वर्षाआतील मुले | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | ०१-०१-२००६ अथवा त्यानंतरचा |
| ७ | ज्युनियर नेहरु कप हॉकी स्पर्धा | १७ वर्षाआतील मुले | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | ०२-११-२००२ अथवा त्यानंतरचा |
| ८ | सब ज्युनियर नेहरु कप हॉकी स्पर्धा | १५ वर्षाआतील | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | ०२.११.२००४ अथवा त्यानंतरचा |

टिप :- १) शालेय व सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल क्रीडा स्पर्धेकरीता खेळांडूचे वयोगट दि. ३१ डिसेंबर, २०१९ रोजी निश्चित करण्यात यावे.

२) ज्युनिअर व सब ज्युनिअर नेहरु कप हॉकी स्पर्धेकरीता खेळांडूचे वयोगट दि. १ नोव्हेबर, २०१९ रोजी निश्चित करण्यात यावे.

३) भारतीय शालेय खेळ महासंघ, आग्रा (उत्तरप्रदेश) यांनी १४,१७,१९ वर्षाआतील खेळांडूना शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी किमान इयत्ता सहावीची तर ११ वर्षाआतील खेळाडूंसाठी किमान इयत्ता तिसरीची अट कायम ठेवलेली आहे. इयत्ता ६ वीच्या खालच्या वर्गातील विद्यार्थी खेळाडू १४,१७,१९ तर इयत्ता तिसरीच्या खालच्या वर्गातील विद्यार्थी खेळाडू ११ वर्षाआतील वयोगटात शालेय क्रीडा स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी पात्र नाही.

४) इयत्ता ६ वी अथवा पुढील कोणत्याही इयत्तेत शिकत असलेले खेळाडू जर जन्म तारखेनुसार वयोगटाची अट पूर्ण करीत असतील तर ते त्या वयोगटात सहभागास पात्र असतील.

५) इयत्ता ११ वी मध्ये शिकत असलेले व जन्म तारखेनुसार १७ वर्षे वयोगटासाठी पात्र असतील अशा खेळाडूंना गतवर्षाचे गुणपत्रक अथवा प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

६) खेळाडूस एका वयोगटात जास्तीत जास्त ३ वर्ष सहभाग घेता येईल.

## शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन

शालेय क्रीडास्पर्धेचे आयोजन खालील वयोगटात करण्यात येते.

१) १९ वर्षाआतील मुले / मुली
२) १७ वर्षाआतील मुले / मुली
३) १४ वर्षाआतील मुले / मुली
४) ११ वर्षाआतील मुले / मुली

## शालेय व इतर क्रीडा स्पर्धा आयोजनाचा स्तर

शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय व काही खेळांच्या आंतरराष्ट्रीयस्तर या क्रमाने करण्यात येते.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात महानगरपालिका शाळा व महानगरपालिका हद्दीतील अनुदानित/विना अनुदानित खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील विविध वयोगटातील भारतीय शालेय खेळ महासंघ पुरस्कृत शालेय व इतर क्रीडा स्पर्धेचे आयोजन संबंधित महानगरपालिकेमार्फत थेट जिल्हास्तरा पासुन करण्यात येईल.

जिल्हा स्तरीय स्पर्धेतुन प्रत्येक सांघिक खेळातील विजयी संघ/वैयक्तीक स्पर्धेतुन प्रथम, द्वितीय क्रमांकाचा खेळाडूं विभागीयस्तरावर व विभागीयस्तरावरील विजयी संघ/खेळाडूं राज्यस्तरावर पाठविण्यात येईल.

शालेय मैदानी व जलतरण या वैयक्तीक स्पर्धेत जिल्हा स्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत प्रथम व द्वितीय क्रमांकाचा खेळाडू पुढील स्तरावर पाठविण्यात येईल, मात्र रिलेचा फक्त विजयी संघच जिल्हास्तरापासून राज्यस्तरापर्यंत पाठविण्यात येईल.

कुस्ती, ज्युदो, वेटलिफ्टींग, बॉक्सिंग, तायक्वाँदो,किक बॉक्सींग, सिकई मार्शल आर्ट, वुशु, कराटे या खेळातील त्या-त्या वजनगटातील फक्त प्रथम क्रमांकाचाच स्पर्धक पुढील स्तरावर पाठविण्यात येईल. जिम्नॅस्टिक, बुध्दीबळ, लॉनटेनिस, फेन्सिंग, शुटींग आणि धनुर्विद्या या खेळांमध्ये खेळाडूंची गुणानुक्रमे निवड करुन पुढील प्रत्येक स्तरावर स्पर्धेसाठी पाठविण्यात येईल.

# शालेय क्रीडा स्पर्धांसाठी खेळ, वयोगट व खेळाडू संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | खेळ | वयोगट | | प्रत्येक संघातील खेळाडू संख्या |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| १. | आर्चरी (धनुर्विद्या) (इंडियन, फीटा, कम्पाऊंड) | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | प्रत्येक प्रकारात ०४ खेळाडू |
| २. | ॲथलेटिक्स | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | स्पर्धेतील बाबनिहाय ०२ खेळाडू |
| | क्रॉसकंट्री | १९ वर्षाआतील | १९ वर्षाआतील | ०६ |
| ३. | जलतरण | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | स्पर्धेतील बाबनिहाय ०२ खेळाडू |
| | डायव्हिंग | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०५ |
| ४. | वॉटरपोलो | १९ वर्षाआतील | ---- | १३ |
| ५. | बॅडमिंटन | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०५ |
| ६. | बास्केटबॉल | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १२ |
| ७. | चेस (बुध्दीबळ) | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०५ |
| ८. | क्रिकेट | १४,१७,१९ वर्षाआतील | १७,१९ वर्षाआतील | १६ |
| ९ | कराटे | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | प्रत्येक वजनीगटात ०२ खेळाडू |
| १० | सायकलींग रोड रेस | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०६ |
| ११ | फुटबॉल | १४,१७,१९ वर्षाआतील | १४, १७,१९ वर्षाआतील | १८ |
| १२ | आर्टिस्टीक जिम्नॅस्टिक्स | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०७ |
| | ॲक्रोबॅटिक जिम्नॅस्टिक्स | १९ वर्षाआतील | १९ वर्षाआतील | मुले ७, मुली ६ |
| | रिद्मिक जिम्नॅस्टिक्स | ----- | १४,१७,१९ वर्षाआतील | ०४ |
| १३ | हॅन्डबॉल | १४,१७,१९वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १६ |
| १४ | हॉकी | १४,१७,१९वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १८ |
| १५ | ज्युदो | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | प्रत्येक वजनीगटात ०२ खेळाडू |
| १६ | कबड्डी | १४,१७,१९ वर्षाआतील (वजन गटानुसार) | १४,१७,१९ वर्षाआतील (वजन गटानुसार) | १२ |

# शालेय क्रीडा स्पर्धांसाठी खेळ, वयोगट व खेळाडू संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | खेळ | वयोगट | | प्रत्येक संघातील खेळाडू संख्या |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| १७ | खो-खो | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९वर्षाआतील | १२ |
| १८ | लॉनटेनिस | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०५ |
| १९ | टेबल टेनिस | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०५ |
| २० | व्हॉलीबॉल | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १२ |
| २१ | वेटलिफ्टींग | १७, १९ वर्षाआतील | १७, १९ वर्षाआतील | प्रत्येक वजनीगटात ०२ खेळाडू |
| २२ | कुस्ती(फ्री स्टाईल) | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | प्रत्येक वजनीगटात ०२ खेळाडू |
| | कुस्ती(ग्रीको रोमन) | १७,१९ वर्षाआतील | - - - - | प्रत्येक वजनीगटात ०२ खेळाडू |
| २३ | तायक्वॉदो | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | प्रत्येक वजनीगटात ०२ खेळाडू |
| २४ | बॉक्सिंग (मुष्टीयुध्द) | १४,१७,१९ वर्षाआतील | १७,१९ वर्षाआतील | प्रत्येक वजनीगटात ०२ खेळाडू |
| २५ | किक बॉक्सींग | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | प्रत्येक वजनीगटात ०२ खेळाडू |
| २६ | नेटबॉल | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १२ |
| २७ | फेन्सिंग (तलवारबाजी) | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १२ |
| २८ | सॉफ्ट बॉल | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १६ |
| २९ | स्क्वॉश | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०४ |
| ३० | बेसबॉल | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १६ |
| ३१ | योगासन | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०७ ( २ राखीव ) |
| ३२ | शुटींग (नेमबाजी एअर वेपन) | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | प्रत्येक प्रकारात ०३ खेळाडू |
| ३३ | रोलर स्केटिंग (क्वॉड व इनलाईन) | ११, १४,१७,१९ वर्षाआतील | ११,१४,१७,१९वर्षाआतील | प्रत्येकी ०३ |
| ३४ | रोलर हॉकी | १९ वर्षाआतील | - | १२ |
| ३५ | सिकई मार्शल आर्ट | १४,१७, १९ वर्षाआतील | १४,१७, १९ वर्षाआतील | प्रत्येक वजनीगटात ०२ खेळाडू |
| ३६ | रोल बॉल | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १२ |
| ३७ | डॉज बॉल | १७, १९ वर्षाआतील | १७, १९ वर्षाआतील | १० |
| ३८ | वुशु | १७, १९ वर्षाआतील | १७, १९ वर्षाआतील | प्रत्येक वजनीगटात ०२ खेळाडू |
| ३९ | कॅरम | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०६ |
| ४० | मल्लखांब /रोप मल्लखांब | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०५ |
| ४१ | बॉलबॅडमिटन | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १० |

## शालेय व महिला क्रीडा स्पर्धांसाठी खेळ, वयोगट व खेळाडू संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | खेळ | वयोगट | | प्रत्येक संघातील खेळाडू संख्या |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| ४२ | शुटींग बॉल | १७,१९ वर्षाआतील | १७,१९ वर्षाआतील | १० |
| ४३ | थ्रोबॉल | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १२ |
| ४४ | रग्बी | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १२ |
| ४५ | मॉडर्न पेंटॅथलॉन | १९ वर्षाआतील | १९ वर्षाआतील | ०४ |
| ४६ | सेपक टकरा | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०५ |
| ४७ | सॉफ्टटेनिस | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०५ |
| ४८ | टेनिक्वॉईट | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०६ |
| ४९ | आटयापाटया | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | १२ |
| ५० | आश्ते डू आखाडा | १७,१९ वर्षाआतील | १७,१९ वर्षाआतील | प्रत्येक वजनी गटात ०२ खेळाडू |
| ५१ | युनिफाईट | १७,१९ वर्षाआतील | १७,१९ वर्षाआतील | प्रत्येक वजनी गटात ०२ खेळाडू |
| ५२ | मॉन्टेक्सबॉल क्रिकेट | १९ वर्षाआतील | १९ वर्षाआतील | १४ |
| ५३ | स्पीडबॉल | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | ०८ |
| ५४ | तांग सू डो | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | प्रत्येक वजनी गटात ०२ खेळाडू |
| ५५ | फिल्ड आर्चरी | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | प्रत्येक प्रकारात ०४ खेळाडू |
| ५६ | कुडो | १४,१७,१९ वर्षाआतील | १४,१७,१९ वर्षाआतील | प्रत्येक वजनी गटात ०२ खेळाडू |

टिप :-अनु क्र. ५० ते ५६ पर्यंतच्या खेळांमध्ये सहभागी होणा-या खेळाडूंना क्रीडा सवलतीचे गुण, शासकीय/निम्नशासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण, जिल्हा, राज्यस्तरावर देण्यात येणारे क्रीडा पुरस्कार इत्यादी कोणतेही लाभ देण्यात येणार नाही .

## इतर क्रीडा स्पर्धांसाठी खेळ, वयोगट व खेळाडू संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र | खेळ | वयोगट | | प्रत्येक संघातील खेळाडू संख्या |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| १. | सुब्रतो मुखर्जी कप फूटबॉल | १४,१७ वर्षाआतील | १७ वर्षाआतील | १६ |
| २. | जवाहरलाल नेहरू कप हॉकी | १५,१७ वर्षाआतील | १७ वर्षाआतील | १६ |

# शालेय क्रीडा स्पर्धेचे नियम

शालेय क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय शालेय खेळ महासंघाने पुरस्कृत केलेले नियम अवलंबविण्यात येतील. एका खेळाच्या शालेय क्रीडा स्पर्धेत एका खेळाडूस एकाच वयोगटात भाग घेता येईल.

**उदा. फुटबॉल या खेळात १४ वर्षाआतील खेळाडूला १७ वर्षाआतील किंवा १९ वर्षाआतील वयोगटात सहभागी होता येईल, मात्र त्याच वर्षात त्यास १४ वर्षाआतील किंवा सहभाग न घेतलेल्या दुसऱ्या वयोगटात सहभागी होता येणार नाही, परंतु फुटबॉलऐवजी दुसऱ्या खेळात तो वयोगट बदलू शकतो.**

एक खेळाडू कोणत्याही खेळ प्रकारामध्ये एका वयोगटामध्ये जास्ती -जास्त ३ वर्षे सहभागी होऊ शकतो.जो खेळाडू एका वर्गामध्ये नापास झाला तर त्या वर्गात असताना तो एकदाच सहभाग घेऊ शकतो.

★ शालेय व इतर क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊ इच्छिणा-या प्रत्येक प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांनी संबंधित शैक्षणिक वर्षामध्ये विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होण्याबाबतची प्राथमिक प्रवेशिका सलग्न शुल्क, प्रवेश शुल्क रक्कमेसह दिनांक १५ ऑगस्ट, २०१९ पूर्वी अथवा पर्यंत ऑनलाईन प्रणाली व्दारे सादर करावी.

**१) मैदानी स्पर्धा:-**

अ) सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात मैदानी स्पर्धेच्या एका वैयक्तिक बाबीत एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडू सहभागी होऊ शकतील, **मात्र पुढील स्तरावर एका वैयक्तिक बाबीत प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना पाठविण्यात येईल.**

ब) एका खेळाडूस रिले वगळता ३ पेक्षा जास्त वैयक्तिक बाबीमध्ये भाग घेता येणार नाही.

क) सांघिक बाब रिलेसाठी एकच संघ भाग घेऊ शकेल. संघात चार खेळाडूंचा समावेश राहिल.

**(मैदानी स्पर्धेच्या बाबी पृष्ठ क्रमांक १५ वर पहावे)**

**२) क्रॉसकन्ट्री :-**

क्रॉसकंट्री धावण्याची स्पर्धा फक्त १९ वर्षाआतील मुला-मुलींसाठी असून क्रॉसकंट्री धावण्याचे अंतर मुलांसाठी ०६ किलोमीटर व मुलींसाठी ०४ किलोमीटर राहील. क्रॉसकंट्रीचा संघ ६ खेळाडूंचा असून त्यापैकी ४ खेळाडू प्रत्यक्ष शर्यतीत भाग घेतील व २ खेळाडू राखीव असतील. सांघिक विजेते पदासाठी संघातील ३ खेळाडू अंतिम रेषेपर्यंत स्पर्धा पूर्ण करतील व गुणानुक्रमे १० मध्ये असतील अशा संघाना वेळेप्रमाणे क्रमवारी देण्यात येईल, **परंतु पुढील प्रत्येक स्तरावर संघ पाठविताना अनुक्रमे १ ते ६ क्रमांकाचे स्पर्धक पाठविण्यात येतील.**

**३) जलतरण :-**

अ) सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात जलतरण स्पर्धेच्या एका वैयक्तिक बाबीत एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडू सहभागी होऊ शकतील, **मात्र पुढील स्तरावर एका वैयक्तिक बाबीत प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना पाठविण्यात येईल.**

ब) एका खेळाडूस रिले वगळता **३ पेक्षा जास्त वैयक्तिक बाबींमध्ये भाग घेता येणार नाही.**

क) सांघिक बाब रिले व वॉटरपोलो स्पर्धेसाठी एकच संघ भाग घेऊ शकेल. रिले संघात दोन राखीव खेळाडूंचा समावेश करता येईल. **(जलतरण स्पर्धेच्या बाबी पृष्ठ क्रमांक १६ वर पहावे)**

**४) कुस्ती :-**

कुस्तीमध्ये ग्रीकोरोमन या प्रकारचा समावेश करण्यात आलेला असून खेळांडूस फ्री स्टाईल किंवा ग्रीकोरोमन या दोन प्रकारापैकी कोणत्याही एका प्रकारात सहभागी होता येईल.एका वजन गटात एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडूंना भाग घेता येईल, **मात्र पुढील स्तरावर प्रथम क्रमांकाचाच खेळाडू पाठविण्यात येईल. (वजन गट पृष्ठ क्रमांक १७ वर पहावे)**

**५) ज्युदो :-**

एका वजन गटात एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडूंना भाग घेता येईल.**मात्र पुढील स्तरावर प्रथम क्रमांकाचाच खेळाडू पाठविण्यात येईल. (वजन गट पृष्ठ क्रमांक १८ वर पहावे)**

**६) बॉक्सिंग :-**

एका वजन गटात एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडूंना भाग घेता येईल, **मात्र पुढील स्तरावर प्रथम क्रमांकाचाच खेळाडू पाठविण्यात येईल.(वजन गट पृष्ठ क्र.१९ ते २० वर पहावे)**

**७) तायक्वॉन्दो :-**

एका वजन गटात एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडूंना भाग घेता येईल, **मात्र पुढील स्तरावर प्रथम क्रमांकाचाच खेळाडू पाठविण्यात येईल.(वजन गट पृष्ठ क्र.२१ ते २२ वर पहावे)**

**८) वेटलिफ्टिंग :-**

एका वजन गटात एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडूंना भाग घेता येईल, **मात्र पुढील स्तरावर प्रथम क्रमांकाचाच खेळाडू पाठविण्यात येईल. (वजन गट पृष्ठ क्र. २२ वर पहावे)**

**९) किक बॉक्सिंग :-**

एका वजन गटात एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडूंना भाग घेता येईल, **मात्र पुढील स्तरावर प्रथम क्रमांकाचाच खेळाडू पाठविण्यात येईल.(वजन गट पृष्ठ क्रमांक २३ वर पहावे)**

१०) **सिकई मार्शल आर्ट :-**

एका वजन गटात एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडूंना भाग घेता येईल, **मात्र पुढील स्तरावर प्रथम क्रमांकाचाच खेळाडू पाठविण्यात येईल. (वजन गट पृष्ठ क्रमांक २३ वर पहावे)**

११) **वुशू :** एका वजन गटात एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडूंना भाग घेता येईल, **मात्र पुढील स्तरावर प्रथम क्रमांकाचाच खेळाडू पाठविण्यात येईल.(वजन गट पृष्ठ क्रमांक २३ वर पहावे)**

१२) **कराटे :** एका वजन गटात एका शाळेचे जास्तीत जास्त दोनच खेळाडूंना भाग घेता येईल, **मात्र पुढील स्तरावर प्रथम क्रमांकाचाच खेळाडू पाठविण्यात येईल.(वजन गट पृष्ठ क्रमांक २४ वर पहावे)**

१३) **लॉन टेनिस :-**

लॉन टेनिस खेळाच्या स्पर्धा वैयक्तिक खेळ म्हणून घेण्यात येतील. एका शाळेतील, कनिष्ठ महाविद्यालयातील जास्तीत जास्त ५ खेळाडूंना प्रवेश दिला जाईल. **स्पर्धेतून पुढील स्तरावर प्रथम ५ क्रमांकावर येणाऱ्या खेळाडूंना पाठविण्यात येईल.**

१४) **टेबल टेनिस :-**

हा खेळ सांघिक व वैयक्तिक या दोन्हीही प्रकारामध्ये खेळला जातो. या खेळाचे आयोजन भारतीय शालेय खेळ महासंघ व अखिल भारतीय एकविध टेबलटेनिस महासंघाच्या नियमानुसार करण्यात येईल. **संघातील खेळाडूंची संख्या किमान ३ व जास्तीत जास्त ५ असावीत.**

१५) **बॅडमिंटन :-**

श्री. रणजित नातू यांनी बॅडमिंटन स्पर्धेत खेळाडूंचा सहभागाबाबत नियम शिथिल करण्याविषयी मा. संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांना विनंती केली होती, त्यांच्या विनंती वरून मा. संचालक, क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शिवछत्रपति क्रीडापीठ, बालेवाडी, पुणे येथे दिनांक २२ ते २४ जून २००१ या कालावधीत सर्व विभागीय व जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या समवेत संपन्न झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली, व सर्वानुमते असे ठरले की, बॅडमिंटन या खेळाच्या संघात किमान २ खेळाडू असतील तरी खेळाडूंना स्पर्धेत सहभागी करुन घेता येईल.

१६) **जिम्नॅस्टिक्स :-**

अ) **आर्टिस्टीक जिम्नॅस्टिक्स-**

१४, १७, १९ वर्षाआतील मुलांना फ्लोअर एक्झरसाईज, टेबल व्हॉल्ट, पॅरलल बार, पोमेल हॉर्स, रोमन रिंग, हॉरिझंटल बार या साहित्यांवर व मुलींना फ्लोअर एक्सरसाईज, टेबल व्हॉल्ट, अनइव्हन बार, बॅलन्सींग बीम या साहित्यांवर ऐच्छिक संच करावे लागेल.

ब) **रिदमिक जिम्नॅस्टिक्स :-**

१४,१७, १९ वर्षाआतील मुलींना बॉल, रिबन, रोप, क्लबस् आणि रिंग साहित्यासह फक्त ऐच्छिक संच करावे लागतील.

क) **ॲक्रोबॅटिक्स :**

फक्त ऐच्छिक संच करावे लागतील.

१) मेन्स पेअर २) वूमेन्स पेअर ३) मिक्स पेअर

४) ट्रायो महिला ५) मेन्स टीम (४ मुले)

१७) **क्रिकेट :**

स्पर्धा बाद पध्दतीने खेळविण्यात येईल. प्रत्येक संघास मर्यादित षटकांचा एक डाव राहील. एका संघास जास्तीत जास्त ३० षटके देण्यात येतील, ही ३० षटके दोन तासात टाकण्यात यावीत. काही कारणास्तव सामना सुरू करण्यास विलंब झाल्यास प्रत्येकी संघास १५ षटके देण्यात येतील.

१८) **आर्चरी (धनुर्विद्या):-**

या स्पर्धा इंडियन राऊंड, फिटा राऊंड व कम्पाऊंड या पध्दतीने आयोजित करणात येतील.

| वयोगट | इंडियन राऊंड अंतर | फिटा राऊंड अंतर | कंपाऊन्ड |
|---|---|---|---|
| १४ मुले / मुली | ३०, २० मी. | ६०,५०,४०,३० मी. | ५० मी. |
| १७ मुले / मुली | ४०,३० मी | ६०, ६० मी. | ५० मी. |
| १९ मुले / मुली | ५०,३० मी | ७०,६०,५०,३० मी. | ५० मी. |

१९) **सायकलींग रोड रेस :-**

सायकलींग रोड रेस स्पर्धेत भारतीय बनावटीची सायकल वापरण्यात यावी. सायकलींग रोडरेसचे अंतर खालीलप्रमाणे :

| बाब | १४ वर्षाआतील | | १७ वर्षाआतील | | १९ वर्षाआतील | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| टाईम ट्रायल्स | ०५ ते ०७ कि.मी. | ०४ ते ०६ कि.मी | १० ते १५ कि.मी. | ०५ ते १० कि.मी. | १५ ते २० कि.मी. | १० ते १५ कि.मी. |
| मास स्टार्ट | १० ते १५ कि.मी. | ०५ ते १० कि.मी. | ३० ते ३५ कि.मी. | १५ ते २० कि.मी. | ४० ते ४५ कि.मी. | २० ते २५ कि.मी. |

२०) **योगासन :-**

१) सांघिक स्पर्धा (०५ खेळाडू) २) वैयक्तिक रिदमिक योगा स्पर्धा (०१ खेळाडू) ३) वैयक्तिक आर्टिस्टीक योगा स्पर्धा (०१ खेळाडू)

खेळाडूंच्या प्रत्येक वयोगटातील संघात जास्तीत जास्त सात खेळाडू असतील. त्यात एक खेळाडू राखीव राहील. ज्या संघात चार पेक्षा कमी खेळाडू असतील त्यांना सांघिक चॅम्पियनशिपमध्ये भाग घेता येणार नाही, परंतु अशा खेळाडूंच्या वैयक्तिक कामगिरीचे मुल्यांकन करता येईल. सांघिक विजेते पदाकरिता केवळ चार सर्वोत्कृष्ट खेळाडूंचे गुणांकन विचारात घेतले जाईल. ग्रुप-ए,

ग्रुप-बी आणि ग्रुप-सी मध्ये नमूद केलेल्या आसनांचा स्पर्धेत समावेश आहे. ग्रुपनिहाय आसनांची चित्रे पुढील प्रमाणे आहेत.



★ ग्रुप - ए ची आसने १४ वर्षा आतील खेळाडूंनी १.३० मिनिट व १७, १९ वर्षाआतील खेळाडूंनी २.३० मिनिटे आसने टिकवावीत.

★ ग्रुप-बी ची आसने १४ वर्षाआतील खेळाडूंनी २० सेकंद व १७, १९ वर्षातील खेळाडूंनी ३०सेकंद आसने टिकवावीत.

★ ग्रुप- सी ची आसने १४ वर्षाआतील खेळाडूंनी १५ सेकंद व १७, १९ वर्षाआतील खेळाडूंनी २० सेकंद टिकवावीत. अंतिम फेरीसाठी सूर्यनमस्कार पहिले तीन स्थिती अनिवार्य आहेत.

★ ग्रुप ए व ग्रुप बी ची आसने ड्रॉ पध्दतीने काढली जातील. ग्रुप सी करीता कोणतेही एक आसन स्पर्धकाला निवडता येईल.

★ ग्रुप ए,बी व सी मधील १८ आसनांपैकी ३ आसने आवश्यक करावीच लागतील. या बरोबरच स्पर्धकाच्या इच्छेनुसार कोणतेही दोन आसन करता येतील. ह्या प्रमाणे एकुण पाच आसने स्पर्धकाला करावे लागतील. प्रत्येक आसनाला १० गुण आहेत.

★ गुण प्रदान करताना आसनांची बांधणी किंवा आसन घ्यावयाची पध्दत, स्थिती, चेह-यावरील हास्य (हावभाव) व प्रसन्न मुद्रा बाबींचा विचार केला जाईल.

**रिदमिक योगा -**

१. प्रत्येक वयोगटातील सहाव्या क्रमांकावरील स्पर्धकास रिदमिक योगा सादर करावा लागेल.

२. रिदमिक योगामध्ये ०८ ते १० आसने सादर करणे अनिवार्य आहे.

३. रिदमिक योगांचा कालावधी २.०० ते २.३० मिनिटे राहिल. २.०० मिनिटांपेक्षा कमी किंवा २.३० मिनिटांपेक्षा जास्त वेळ घेतल्यास १ गुण कमी करण्यात येईल.

४. रिदमिक योगा संगिताच्या तालावर करणे अनिवार्य आहे.

५. १०×१२ च्या जागेमध्ये खेळाडूंनी वेगळया ठिकाणांचा वापर करुन आपला संच सादर करावा.

**आर्टिस्टीक योगा-**

१. प्रत्येक वयोगटातील सातव्या क्रमांकावरील स्पर्धकास आर्टिस्टीक योगा सादर करावा लागेल.

२.स्पर्धकांच्या इच्छेनुसार प्रत्येकी ०५ आसन करावी लागतील.

३. आसनाचा कालावधी १५ सेकंद राहिल.

४. आर्टिस्टिक योगामध्ये प्रणवध्वनी (ओंकार) ०२ वेळ म्हणणे अनिवार्य आहे.

२१) **शुटींग / नेमबाजी (एअर वेपन) :-**

शालेय शुटींग / नेमबाजी (एअर वेपन) स्पर्धेत एअर पिस्टन , ओपन साईट एअर राईफल व पीप साईट एअर राईफल या तीन स्पर्धा असून खेळाडूने एकाच स्पर्धेत भाग घ्यावा.

२२) **तलवारबाजी :-** शालेय तलवारबाजी या खेळाच्या स्पर्धा फॉईल ( foil), ईपी ( Epee), सैबर ( Saber) या तीन क्रीडा प्रकारात आयोजित करण्यात येतात.एका खेळाडूस दोन पेक्षा जास्त क्रीडा प्रकारात भाग घेता येणार नाही.

२३) **कबड्डी :-** शालेय कबड्डी स्पर्धा वयोगटनिहाय खालील वजन गटानुसार होतील.

| वयोगट | मुले | मुली | क्रींडागण मोजमाप |
|---|---|---|---|
| १४ वर्षा आतील | ५१ किलो | ४८ किलो | ११ X ८ मीटर |
| १७ वर्षा आतील | ५७ किलो | ५३ किलो | १२ X ८ मीटर |
| १९ वर्षा आतील | ६५ किलो | ५९ किलो | १३ X १० मीटर मुले १२ X ८ मुली |

**टीप :-** १) शालेय व इतर क्रीडा स्पर्धा त्या-त्या खेळाच्या अखिल भारतीय एकविध खेळ महासंघाच्या प्रचलित नियमानुसार आयोजित करण्यात येतील.

## शालेय स्पर्धेत सहभागी होणा-या शाळांच्या पात्रतेबाबत

**शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये खालील शाळा सहभागी होण्यास पात्र आहेत.**

अ) राज्यशासनाच्या शिक्षण विभागाची मान्यता असलेल्या सर्व अधिकृत प्राथमिक / माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये तसेच महानगरपालिका द्वारा संचलित प्राथमिक / माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये.

ब) सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन ( सी.बी. एस. ई) बोर्डाला संलग्नीत असलेल्या सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये.

क) राज्य शासनाने सुरू केलेल्या सैनिकी शाळा.

ड) क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारा संचलित क्रीडा प्रबोधिनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी स्वतंत्र विभाग म्हणून पात्र राहतील. आय. पी. एस.सी., जवाहर नवोदय विद्यालय आणि केंद्रीय विद्यालय संघटन यांना राष्ट्रीय स्पर्धात सहभागासाठी स्वतंत्र घटक म्हणून प्रवेश मिळत असल्यामुळे ते क्रीडा व युवक सेवा संचालनालयाव्दारा आयोजित क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होण्यास पात्र नाहीत.

## मैदानी स्पर्धा - खेळाच्या बाबी
## १९ वर्षाआतील मुले / मुली

| खेळाची बाब - मुले | खेळाची बाब - मुली |
|---|---|
| **धावणे :** १००, २००, ४००, ८००, १५००, ३००० मी.<br>**चालणे :** ५००० मी.<br>**रिले :** ४ x १०० मी. व ४ x ४०० मी.रिले<br>**हर्डल्स :** ११० मी. (उंची ०.९१.४ मी.) ४०० मी. (०.८३.८ मी.)<br>**उडी :** उंच उडी, लांब उडी, तिहेरी उडी, बांबू उडी<br>**फेकी :** थाळी फेक (१.५ किलोग्रॅम)<br>गोळा फेक (५.०० कि.ग्रॅम)<br>हातोडा फेक (५. कि.ग्रॅम)<br>भाला फेक (७०० ग्रॅम) | **धावणे :** १००, २००, ४००, ८००, १५००, ३०००,<br>**चालणे:** ३००० मी.<br>**रिले :** ४ x १०० मी. व ४ x ४०० मी.<br>**हर्डल्स :** १०० मी. (उंची ०.७६.२ मी.) ४०० मी. (०.७६.२ मी.)<br>**उडी :** उंच उडी, लांब उडी, तिहेरी उडी, बांबु उडी<br>**फेकी :** थाळी फेक (१ किलोग्रॅम)<br>गोळा फेक (३ कि.ग्रॅम)<br>हातोडा फेक (३ कि.ग्रॅम)<br>भाला फेक (५०० ग्रॅम) |

## १७ वर्षाआतील मुले / मुली

| खेळाची बाब - मुले | खेळाची बाब - मुली |
|---|---|
| **धावणे:** १००, २००, ४००, ८००, १५००,३००० मी.<br>**चालणे :** ५००० मी.<br>**रिले :**४ x १०० मी.<br>**हर्डल्स :** ११० मी. (उंची ०.९१.४ मी.) व ४०० मी. (उंची ०.८३.८ मी.)<br>**उडी :**उंच उडी, लांब उडी, तिहेरी उडी, बांबू उडी<br>**फेकी :** थाळी फेक (१.५ किलोग्रॅम)<br>गोळा फेक (५. कि.ग्रॅम)<br>हातोडा फेक (५. कि.ग्रॅम)<br>भाला फेक (७०० ग्रॅम) | **धावणे :** १००, २००, ४००, ८००, १५००,३००० मी.<br>**चालणे:** ३००० मी. **रिले :** ४ x १०० मी.<br>**हर्डल्स:** १०० मी. (उंची ०.७६.२ मी.)<br>४०० मी. (उंची ०.७६.२ मी.)<br>**उडी :** उंच उडी, लांब उडी, तिहेरी उडी, बांबू उडी<br>**फेकी :** थाळी फेक (१ किलोग्रॅम)<br>गोळा फेक (३ कि.ग्रॅम)<br>हातोडा फेक (३. कि.ग्रॅम)<br>भाला फेक (५०० ग्रॅम) |

## १४ वर्षाआतील मुले / मुली

| खेळाची बाब - मुले | खेळाची बाब - मुली |
|---|---|
| **धावणे :** १००, २००, ४००, ६०० मी.<br>**रिले :**४ x १०० मी.<br>**हर्डल्स :** ८० मी. (उंची ०.७६.२ मी.)<br>**उडी :** उंच उडी, लांब उडी<br>**फेकी :** थाळी फेक (१ किलोग्रॅम)<br>गोळा फेक (४ कि.ग्रॅम) | **धावणे :** १००, २००, ४००, ६०० मी.<br>**रिले :** ४ x १०० मी.<br>**हर्डल्स :** ८० मी. (उंची ०.७६.२ मी.)<br>**उडी :** उंच उडी, लांब उडी<br>**फेकी :** थाळी फेक (१ किलोग्रॅम)<br>गोळा फेक (३ कि.ग्रॅम) |

# जलतरण बाबींचा तक्ता

| गट | मुले | खेळाची बाब - मुली |
|---|---|---|
| १९ वर्षाआतील | **फ्रीस्टाईल:** ५०, १००, २००, ४०० व १५०० मी.<br>**बॅकस्ट्रोक :** ५०, १००, २०० मी.<br>**ब्रेस्टस्ट्रोक :** ५०, १००, २०० मी.<br>**बटरफ्लाय :** ५०, १००, २०० मी.<br>**वैयक्तिक मिडले :**२००,४०० मी.<br>**रिले:**४ x १०० मी फ्रीस्टाईल व ४ x १०० मी. मिडले<br>**डायव्हिंग :** १ व ३ मी. स्प्रिंगबोर्ड, हायबोर्ड | **फ्रीस्टाईल:** ५०, १००, २००, ४०० व ८०० मी.<br>**बॅकस्ट्रोक:** ५०, १००, २०० मी.<br>**ब्रेस्टस्ट्रोक:** ५०, १००, २०० मी.<br>**बटरफ्लाय:** ५०, १००, २०० मी.<br>**वैयक्तिक मिडले:** २००,४०० मी.<br>**रिले:** ४ x १०० मी फ्रीस्टाईल व ४ x १०० मी. मिडले<br>**डायव्हिंग :** १ व ३ मी. स्प्रिंगबोर्ड, हायबोर्ड |
| १७ वर्षाआतील | **फ्रीस्टाईल:** ५०, १००, २००, ४०० व ८०० मी.<br>**बॅकस्ट्रोक:** ५०, १००, २०० मी.<br>**ब्रेस्टस्ट्रोक:** ५०, १००, २०० मी.<br>**बटरफ्लाय:** ५०, १००, २०० मी.<br>**वैयक्तिक मिडले:** २००,४०० मी.<br>**रिले:** ४ x १०० मी फ्रीस्टाईल व ४ x १०० मी. मिडले<br>**ड्रायव्हिंग :** १ व ३ मी.स्प्रिंगबोर्ड, हायबोर्ड | **फ्रीस्टाईल:** ५०,१००,२००,४०० मी.<br>**बॅकस्ट्रोक :** ५०, १००, २०० मी.<br>**ब्रेस्टस्ट्रोक :** ५०, १००, २०० मी.<br>**बटरफ्लाय :** ५०, १००, २०० मी.<br>**वैयक्तिक मिडले :** २००, ४०० मी.<br>**रिले :** ४ x १०० मी फ्रीस्टाईल व ४ x १०० मी. मिडले<br>**ड्रायव्हिंग:** १ व ३ मी. स्प्रिंगबोर्ड, हायबोर्ड |
| १४ वर्षाआतील | **फ्रीस्टाईल:** ५०, १००, २००, ४०० मी.<br>**बॅकस्ट्रोक :** ५०, १००, २०० मी.<br>**ब्रेस्टस्ट्रोक :** ५०, १००, २०० मी.<br>**बटरफ्लाय:** ५०, १००, २०० मी.<br>**वैयक्तिक मिडले :** २०० मी.<br>**रिले:** ४ x १०० मी फ्रीस्टाईल व ४ x १०० मी. मिडले<br>**ड्रायव्हिंग :** १ व ३ मी.स्प्रिंगबोर्ड, हायबोर्ड | **फ्रीस्टाईल :** ५०, १००, २००,४०० मी<br>**बॅकस्ट्रोक :** ५०, १००, २०० मी.<br>**ब्रेस्टस्ट्रोक :** ५०, १००, २०० मी.<br>**बटरफ्लाय :** ५०, १००, २०० मी.<br>**वैयक्तिक मिडले :** २०० मी.<br>**रिले:**४ x १०० मी फ्रीस्टाईल व ४ x १०० मी. मिडले<br>**ड्रायव्हिंग:** १ व ३ मी. स्प्रिंगबोर्ड, हायबोर्ड |

## कुस्ती वजन गट ( फ्री स्टाईल )

| १४ वर्षाआतील मुले | १४ वर्षाआतील मुली |
|---|---|
| ३५ किलोग्रॅम | ३० किलोग्रॅम |
| ३८ किलोग्रॅम | ३३ किलोग्रॅम |
| ४१ किलोग्रॅम | ३६ किलोग्रॅम |
| ४४ किलोग्रॅम | ३९ किलोग्रॅम |
| ४८ किलोग्रॅम | ४२ किलोग्रॅम |
| ५२ किलोग्रॅम | ४६ किलोग्रॅम |
| ५७ किलोग्रॅम | ५० किलोग्रॅम |
| ६२ किलोग्रॅम | ५४ किलोग्रॅम |
| ६८ किलोग्रॅम | ५८ किलोग्रॅम |
| ७५ किलोग्रॅम | ६२ किलोग्रॅम |

## कुस्ती वजन गट ( फ्री स्टाईल )

| १७ वर्षाआतील मुली | १९ वर्षाआतील मुली |
|---|---|
| ३८ किलोवरील ते ४० किलोग्रॅम | ५० किलोग्रॅम |
| ४३ किलोग्रॅम | ५३ किलोग्रॅम |
| ४६ किलोग्रॅम | ५५ किलोग्रॅम |
| ४९ किलोग्रॅम | ५७ किलोग्रॅम |
| ५३ किलोग्रॅम | ५९ किलोग्रॅम |
| ५७ किलोग्रॅम | ६२ किलोग्रॅम |
| ६१ किलोग्रॅम | ६५ किलोग्रॅम |
| ६५ किलोग्रॅम | ६८ किलोग्रॅम |
| ६९ किलोग्रॅम | ७२ किलोग्रॅम |
| ७३ किलोग्रॅम | ७६ किलोग्रॅम |

## कुस्ती वजन गट
### ( फ्री स्टाईल व ग्रीकोरोमन)

| १७ वर्षाआतील मुले |
|---|
| ४१ किलो आणि ४५ किलोग्रॅम |
| ४८ किलोग्रॅम |
| ५१ किलोग्रॅम |
| ५६ किलोग्रॅम |
| ६० किलोग्रॅम |
| ६५ किलोग्रॅम |
| ७१ किलोग्रॅम |
| ८० किलोग्रॅम |
| ९२ किलोग्रॅम |
| ११० किलोग्रॅम |

## कुस्ती वजन गट

| ( फ्री स्टाईल) | (ग्रीकोरोमन) |
|---|---|
| १९ वर्षाआतील मुले | १९ वर्षाआतील मुले |
| ५७ किलोग्रॅम | ५५ किलोग्रॅम |
| ६१ किलोग्रॅम | ६० किलोग्रॅम |
| ६५ किलोग्रॅम | ६३ किलोग्रॅम |
| ७० किलोग्रॅम | ६७ किलोग्रॅम |
| ७४ किलोग्रॅम | ७२ किलोग्रॅम |
| ७९ किलोग्रॅम | ७७ किलोग्रॅम |
| ८५ किलोग्रॅम | ८२ किलोग्रॅम |
| ९२ किलोग्रॅम | ८७ किलोग्रॅम |
| ९७ किलोग्रॅम | ९७ किलोग्रॅम |
| १२५ किलोग्रॅम | १३० किलोग्रॅम |

## ज्युदो वजन गट

| १४ वर्षाआतील मुले | १४ वर्षाआतील मुली |
|---|---|
| २५ किलोखालील | २३ किलोखालील |
| ३० किलोखालील | २७ किलोखालील |
| ३५ किलोखालील | ३२ किलोखालील |
| ४० किलोखालील | ३६ किलोखालील |
| ४५ किलोखालील | ४० किलोखालील |
| ५० किलोखालील | ४४ किलोखालील |
| ५० किलोवरील | ४४ किलोवरील |

## ज्युदो वजन गट

| १७/ १९ वर्षाआतील मुले | १७/ १९ वर्षाआतील मुली |
|---|---|
| ४० किलो खालील | ३६ किलो खालील |
| ४५ किलो खालील | ४० किलो खालील |
| ५० किलो खालील | ४४ किलो खालील |
| ५५ किलो खालील | ४८ किलो खालील |
| ६० किलो खालील | ५२ किलो खालील |
| ६६ किलो खालील | ५७ किलो खालील |
| ७३ किलो खालील | ६३ किलो खालील |
| ८१ किलो खालील | ७० किलो खालील |
| ९० किलो खालील | ७० किलो वरील |
| ९० किलो वरील | |

## बॉक्सिंग वजनगट

| १७ वर्षाआतील मुले | १७ वर्षाआतील मुली |
|---|---|
| ४६ किलो खालील | ४२ किलो खालील |
| ४६ किलोवरील ते ४८ किलोपर्यंत | ४२ किलोवरील ते ४४ किलोपर्यंत |
| ४८ किलोवरील ते ५० किलोपर्यंत | ४४ किलोवरील ते ४६ किलोपर्यंत |
| ५० किलोवरील ते ५२ किलोपर्यंत | ४६ किलोवरील ते ४८ किलोपर्यंत |
| ५२ किलोवरील ते ५४ किलोपर्यंत | ४८ किलोवरील ते ५० किलोपर्यंत |
| ५४ किलोवरील ते ५७ किलोपर्यंत | ५० किलोवरील ते ५२ किलोपर्यंत |
| ५७ किलोवरील ते ६० किलोपर्यंत | ५२ किलोवरील ते ५४ किलोपर्यंत |
| ६० किलोवरील ते ६३ किलोपर्यंत | ५४ किलोवरील ते ५७ किलोपर्यंत |
| ६३ किलोवरील ते ६६ किलोपर्यंत | ५७ किलोवरील ते ६० किलोपर्यंत |
| ६६ किलोवरील ते ७० किलोपर्यंत | ६० किलोवरील ते ६३ किलोपर्यंत |
| ७० किलोवरील ते ७५ किलोपर्यंत | ६३ किलोवरील ते ६६ किलोपर्यंत |
| ७५ किलोवरील ते ८० किलोपर्यंत | ६६ किलोवरील ते ७० किलोपर्यंत |
| ८० किलोवरील | ७०किलोवरील ते ७५ किलोपर्यंत |
| | ७५ किलोवरील ते ८० किलोपर्यंत |
| | ८० किलोवरील |

## बॉक्सिंग वजनगट

| १९ वर्षाआतील मुले | १९ वर्षाआतील मुली |
|---|---|
| ४६ किलो खालील | ४५ किलो खालील |
| ४६ किलोवरील ते ४९ किलोपर्यंत | ४५ किलोवरील ते ४८ किलोपर्यंत |
| ४९ किलोवरील ते ५२ किलोपर्यंत | ४८ किलोवरील ते ५१ किलोपर्यंत |
| ५२ किलोवरील ते ५६ किलोपर्यंत | ५१ किलोवरील ते ५४ किलोपर्यंत |
| ५६ किलोवरील ते ६० किलोपर्यंत | ५४ किलोवरील ते ५७ किलोपर्यंत |
| ६० किलोवरील ते ६४ किलोपर्यंत | ५७ किलोवरील ते ६० किलोपर्यंत |
| ६४ किलोवरील ते ६९ किलोपर्यंत | ६० किलोवरील ते ६४ किलोपर्यंत |
| ६९ किलोवरील ते ७५ किलोपर्यंत | ६४ किलोवरील ते ६६ किलोपर्यंत |
| ७५ किलोवरील ते ८१ किलोपर्यंत | ६६ किलोवरील ते ६९ किलोपर्यंत |
| ८१ किलोवरील ते ९१ किलोपर्यंत | ६९ किलोवरील ते ७५ किलोपर्यंत |
| ९१ किलोवरील | ७५ किलोवरील ते ८१ किलोपर्यंत |
| | ८१ किलोवरील |

# बॉक्सिंग वजनगट

| १४ वर्षाआतील मुले |
| --- |
| २८ किलोवरील ते ३० किलोपर्यंत |
| ३० किलोवरील ते ३२ किलोपर्यंत |
| ३२ किलोवरील ते ३४ किलोपर्यंत |
| ३४ किलोवरील ते ३६ किलोपर्यंत |
| ३६ किलोवरील ते ३८ किलोपर्यंत |
| ३८ किलोवरील ते ४० किलोपर्यंत |
| ४० किलोवरील ते ४२ किलोपर्यंत |
| ४२ किलोवरील ते ४४ किलोपर्यंत |
| ४४ किलोवरील ते ४६ किलोपर्यंत |
| ४६ किलोवरील ते ४८ किलोपर्यंत |
| ४८ किलोवरील ते ५० किलोपर्यंत |

## तायक्वाँदो वजनगट

| १४ वर्षाआतील मुले | १४ वर्षाआतील मुली |
|---|---|
| १८ किलो खालील | १६ किलो खालील |
| १८ किलोवरील ते २१ किलोपर्यंत | १६ किलोवरील ते १८ किलोपर्यंत |
| २१ किलोवरील ते २३ किलोपर्यंत | १८ किलोवरील ते २० किलोपर्यंत |
| २३ किलोवरील ते २५ किलोपर्यंत | २० किलोवरील ते २२ किलोपर्यंत |
| २५ किलोवरील ते २७ किलोपर्यंत | २२ किलोवरील ते २४ किलोपर्यंत |
| २७ किलोवरील ते २९ किलोपर्यंत | २४ किलोवरील ते २६ किलोपर्यंत |
| २९ किलोवरील ते ३२ किलोपर्यंत | २६ किलोवरील ते २९ किलोपर्यंत |
| ३२ किलोवरील ते ३५ किलोपर्यंत | २९ किलोवरील ते ३२ किलोपर्यंत |
| ३५ किलोवरील ते ३८ किलोपर्यंत | ३२ किलोवरील ते ३५ किलोपर्यंत |
| ३८ किलोवरील ते ४१ किलोपर्यंत | ३५ किलोवरील ते ३८ किलोपर्यंत |
